उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग
ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

जा.क्र./उमपा/करवि/यु.८/ २५४/२०२३ | दिनांक ०८/०६/२०२३

**वाचा:-** १) विशेष नोटीस क्र. उमपा/करवि/यु.८/२५४, दिनांक २५/०३/२०२३
२) श्रीम. वंदना कैलास बोखारे यांनी दि. ०३/०४/२०२३ रोजी दाखल केलेली हरकत.
(ना.सु.केंद्र टोकन क्र. ४१२०२३०००००६२८२)
३) जा.क्र./उमपा/करवि/२५४, दि. ३१/०५/२०२३ रोजीची सुनावणी नोटीस.
४) सुनावणीचा दिनांक ०७/०६/२०२३

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 56DO019204400 (धर्माजी पाटील कॉलनी, चाळ ए-५, रुम नं. १, दुर्गापाडा, अंबरनाथ गाव, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता कर निर्धारणासंबधी संदर्भ क्र. १ अन्वये विपेश नोटीस बजावण्यात आली आहे.

उक्त नोटीसच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये कर आकारणी जास्त आहे. ती मान्य नसल्यामुळे सदर मिळकतीचे मोजमाप चुकीचे आहे. ते दुरूस्त करावे. अशी हरकत दाखल केली आहे.

उक्त हरकतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ नुसार संबंधितास सुनावणीस उपस्थित राहणे बाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

दिनांक ०७/०६/२०२३ रोजी सुनावणी दरम्यान श्रीम. वंदना कैलास बोखारे हे उपस्थित असुन त्यांनी संदर्भ क्र. २ चे अर्जान्वये कर आकारणी जास्त आहे. ती मान्य नाही. मिळकतीचे मोजमाप चुकीचे आहे. ते दुरूस्ती करावे.असे निवेदन सादर केले आहे.

संदर्भित मिळकतीचे क्षेत्रफळ, वापर, बांधकाम प्रकार, विशेष नोटीसी प्रमाणे बरोबर आहे. सबब संदर्भित मिळकती करीता विशेष नोटीस नुसार निश्चित करण्यात आलेले कर योग्य मुल्य व आकारणी कायम करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) श्रीम. वंदना कैलास बोखारे यांनी दाखल केलेली हरकत अमान्य करण्यात येत आहे.

२) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 56DO019204400 (धर्मांजी पाटील कॉलनी, चाळ ए-५, रुम नं. १, दुर्गापाडा, अंबरनाथ गाव, उल्हासनगर-५) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता विशेष नोटीस नुसार निश्चित करण्यात आलेले करयोग्य मुल्य व आकारणी कायम करुन संबंधित मिळकतधारकास वर्ष २०२३-२०२४ करीता बिल बजावण्यात यावे.

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत,

१) मे कोल्ब्रो ग्रृप, नागपुर
२) श्रीम. वंदना कैलास बोखारे रा. धर्माजी पाटील कॉलनी, चाळ ए-५, रुम नं. १, दुर्गापाडा, अंबरनाथ गाव, उल्हासनगर-५

Scanned with CamScanner